**अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई**

रोजगार सूचना

नामनिर्देशनाची रिक्त पदे भरतीबाबतची जाहिरात

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई हे त्यांच्या आस्थापनेवरील नामनिर्देशनाची रिक्त असलेली खालील पदे भरण्याकरीता निवड सूची व प्रतीक्षा सूची तयार करण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून दिनांक १५/०७/२०२३ ते दिनांक ०५/०८/२०२३ पर्यंत विहित नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवित आहेत.

**पदांचा तपशील :**

| अ. क्र. | संवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **सहायक संशोधन अधिकारी, गट — ब (अराज)** [एस-१४ : ३८६००-१२२८००] | ५ | ५ | १ | ० | २ | १ | ० | ७ | ४ | १४ | ३९ |
| २ | **सांख्यिकी सहायक, गट - क** [एस-१० : २९२००-९२३००] | १३ | ६ | १ | ३ | ३ | २ | १ | १६ | ९ | ४० | ९४ |
| ३ | **अन्वेषक, गट - क** [एस- ८ : २५५००-८११००] | १५ | ८ | ४ | ३ | ५ | ३ | ३ | २५ | १३ | ४८ | १२७ |

**अजा - अनुसूचित जाती, अज - अनुसूचित जमाती, विजा (अ) - विमुक्त जाती (अ), भज (ब) - भटक्या जमाती (ब), भज (क) - भटक्या जमाती (क), भज (ड) - भटक्या जमाती (ड), विमाप्र - विशेष मागास प्रवर्ग, इमाव - इतर मागास वर्ग, आदुघ — आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक.**

वरील पदांसाठी अर्ज करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अतिरिक्त आवश्यक अर्हता, वय, पात्रता, अर्जाचा विहित नमुना, तसेच अर्ज करावयाची पद्धत, परीक्षा शुल्क, आरक्षण आणि इतर माहिती व सूचना या संदर्भातील तपशील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संकेतस्थळ **http://mahades.maharashtra.gov.in** व महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. **वर नमूद केलेल्या पदांची संख्या कमी / जास्त होण्याची तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षणामध्ये वाढ/घट/बदल होण्याची शक्यता आहे. पदांच्या संख्येत बदल झाल्यास उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. सर्व सामाजिक तसेच समांतर आरक्षणांतर्गत उमेदवारांना अर्ज करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, निवड करताना सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत उपलब्ध होणाऱ्या पदांप्रमाणेच निवड करण्यात येईल. पदांच्या संख्येत / आरक्षणात बदल झाल्यास त्याची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.**

सर्व पदांकरीता उमेदवारांना ऑन लाईन पद्धतीने अर्ज करावयाच्या सूचना वरील नमूद केलेल्या संकेतस्थळांवर दिलेल्या आहेत. या सूचनांप्रमाणे **http://mahades.maharashtra.gov.in** या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या ऑनलाईन (On Line) अर्जात माहिती भरावी. अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे असल्याने अर्जातील माहिती अचूक भरण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची असेल. तसेच अर्जामधील भरलेल्या माहितीबाबत संचालनालय जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सर्व पदांसाठीची परीक्षा ऑनलाईन पद्धतीनेच घेण्यात येईल. उमेदवारांची निवड कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येईल.**

राज्यस्तरीय निवड समिती

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

# अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

## नामनिर्देशनाची पदे - भरती जाहिरात

## (मदतीसाठी दूरध्वनी क्रमांक:- ०२२ - २६३८३०४१)

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई हे त्यांच्या आस्थापनेवरील नामनिर्देशनाची खालील रिक्त पदे भरण्याकरीता निवड सूची व प्रतीक्षा सूची तयार करण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून दिनांक १५/०७/२०२३ ते दिनांक ०५/०८/२०२३ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागवित आहेत.

### नामनिर्देशनाने भरावयाची पदे दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | पदाचे नाव | अजा SC | अज ST | विजा अ) VJ (A) | भज (ब) NT (B) | भज (क) NT (C) | भज (ड) NT (D) | विमाप्र SBC | इमाव OBC | आदुघ EWS | खुला Open | एकूण Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित)** [एस-१४ : ३८६००-१२२८००] | **५** | **५** | **१** | **०** | **२** | **१** | **०** | **७** | **४** | **१४** | **३९** |
| समांतर आरक्षण | सर्वसाधारण | ३ | ४ | १ | ० | १ | १ | ० | ५ | ३ | ९ | २७ |
| | महिला | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | ४ | ११ |
| | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | दिव्यांग * | २ (१ पद B / LV व १ पद ASD (M) / MI व MD involving (a) to (d)) | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |
| **२** | **सांख्यिकी सहायक, गट - क** [एस-१० : २९२००-९२३००] | **१३** | **६** | **१** | **३** | **३** | **२** | **१** | **१६** | **९** | **४०** | **९४** |
| समांतर आरक्षण | सर्वसाधारण | **४** | **२** | **१** | **२** | **२** | **२** | **१** | **५** | **४** | **१३** | **३६** |
| | महिला | ४ | २ | ० | १ | १ | ० | ० | ५ | ३ | १२ | २८ |
| | माजी सैनिक | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ६ | १२ |
| | अंशकालिन उमेदवार | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ४ | ९ |
| | खेळाडू | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ४ |
| | प्रकल्पग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ४ |
| | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | दिव्यांग * | ४ (१ पद B / LV, १ पद D / HH, १ पद OA / OL / BL / CP / LC / Dw / AAV, १ पद ASD (M) / SLD / MI व MD involving (a) to (d)) | | | | | | | | | | |
| | अनाथ | १ (संस्थात्मक) | | | | | | | | | | |
| **३** | **अन्वेषक, गट - क** [एस- ८ : २५५००-८११००] | **१५** | **८** | **४** | **३** | **५** | **३** | **३** | **२५** | **१३** | **४८** | **१२७** |
| समांतर आरक्षण | सर्वसाधारण | **४** | **४** | **२** | **२** | **१** | **२** | **२** | **८** | **४** | **१७** | **४६** |
| | महिला | ५ | २ | १ | १ | २ | १ | १ | ७ | ४ | १४ | ३८ |
| | माजी सैनिक | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ४ | २ | ७ | १८ |
| | अंशकालिन उमेदवार | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | १ | ५ | १३ |
| | खेळाडू | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ५ |
| | प्रकल्पग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ५ |
| | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| | दिव्यांग * | ५ (२ पदे B / LV, १ पद D / HH, १ पद OA / BA / OL / CP / LC / Dw / AAV व १ पद ASD (M) / MI व MD involving (a) to (d)) | | | | | | | | | | |
| | अनाथ | १ (संस्थात्मक) | | | | | | | | | | |

**अजा - अनुसूचित जाती, अज - अनुसूचित जमाती, विजा (अ) - विमुक्त जाती (अ), भज (ब) - भटक्या जमाती (ब), भज (क) - भटक्या जमाती (क), भज (ड) - भटक्या जमाती (ड), विमाप्र - विशेष मागास प्रवर्ग, इमाव - इतर मागास वर्ग, आदुघ – आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक.**

* दिव्यांग प्रवर्गासाठी जाहिरातीमधील परिच्छेद ६.१० पहावे.

**टिप :-**

अ) वरील विवरणपत्रात नमूद केलेली पदे ही भरतीवर निर्बंध नसलेल्या संवर्गातील आहेत.

ब) समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या सामाजिक प्रवर्गातून नियमानुसार पदे भरण्यात येतील.

क) वर नमूद केलेल्या पदांची संख्या कमी / जास्त होण्याची तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षणामध्ये वाढ / घट / बदल होण्याची शक्यता आहे. पदांच्या संख्येत बदल झाल्यास उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. सर्व सामाजिक तसेच समांतर आरक्षणांतर्गत उमेदवारांना अर्ज करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, निवड करताना सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत उपलब्ध होणाऱ्या पदांप्रमाणेच निवड करण्यात येईल. पदांच्या संख्येत / आरक्षणात बदल झाल्यास त्याची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

ड) निवड यादीमध्ये नाव असले तरी उमेदवारांना नियुक्तीबाबत हक्क सांगता येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

इ) उपरोक्त पदांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया व परीक्षा पूर्णपणे ऑनलाईन (On Line) पद्धतीनेच घेण्यात येईल.

## २. पात्रताविषयक अटी :-

| | |
|---|---|
| (२.१) | उमेदवार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domiciled) असावा. त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| (२.२) | मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| (२.३) | **शैक्षणिक अर्हता** |
| (२.३.१) | **सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित)** |
| | अ] मान्यताप्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी / बायोमेट्री / गणित /अर्थशास्त्र / इकॉनॉमेट्रीक्स / गणिती अर्थशास्त्र / वाणिज्य या विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>**किंवा**<br>ब] मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील किमान द्वितीय श्रेणी किंवा ४५% गुणांसह पदवी आणि भारतीय सांख्यिकीय संस्था (I.S.I.) किंवा भारतीय कृषी संशोधन परीषद (I.C.A.R.) किंवा शासन मान्य संस्था यातील जिच्या प्रवेशासाठी किमान अर्हता पदवी आहे अशी संख्याशास्त्रातील पदव्युत्तर पदविका. |
| (२.३.२) | **सांख्यिकी सहायक, गट - क** |
| | अ] मान्यता प्राप्त विद्यापीठाची गणित / अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी / इकॉनॉमेट्रिक्स या विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>**किंवा**<br>ब] मान्यता प्राप्त विद्यापीठाची गणित / अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी / इकॉनॉमेट्रिक्स यापैकी एक विषय घेवून द्वितीय श्रेणी किंवा ४५% गुणांसह पदवी. |
| (२.३.३) | **अन्वेषक, गट - क** |
| | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

## ३. अतिरिक्त आवश्यक अर्हता :-

| | |
|---|---|
| (३.१) | **संगणक अर्हता** |
| | सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक – प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ नुसार **संगणक हाताळणी / वापराबाबतचे** खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून २ वर्षांच्या आत प्राप्त करणे व सादर करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| | [अ] D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र<br>**किंवा**<br>[ब] महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT अथवा GECT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**किंवा**<br>[क] शासन निर्णय क्रमांक – मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ नुसार समकक्ष ठरविलेले अभ्यासक्रमधारक. |
| (३.२) | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक – पअंक-१००१/७२४/प्र.क्र.५४/२००१/१६-अ, दिनांक ३१/०८/२००२ नुसार फक्त अंशकालीन उमेदवार यांना संगणक अर्हता धारण करण्यास नियुक्तीपासून १ वर्षाची सवलत देण्यात येईल. |
| (३.३) | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १०/०६/१९७६, दिनांक ०१/१२/१९८४ व दिनांक ३०/१२/१९८७ अन्वये उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी (निम्नस्तर व उच्चस्तर) भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| (३.४) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक केले आहे. सदरचे प्रतिज्ञापन प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. <u>अविवाहित उमेदवारांनीसुद्धा प्रतिज्ञापनात अविवाहित असल्याचे नमूद करून प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे.</u> ही प्रतिज्ञापने कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराने सादर करणे आवश्यक आहे. |

**४. वयोमर्यादा** :-

| | |
|---|---|
| (४.१) | सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट - क या पदांसाठी दिनांक ०१/०७/२०२३ रोजी वय किमान १८ वर्ष पूर्ण असावे (दिनांक ०१/०७/२००५ वा त्यानंतर जन्म झालेला नसावा).<br>सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक – सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२, दिनांक ०३/०३/२०२३ अन्वये शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक – एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/का-१२, दिनांक २५/०४/२०१६ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे) दोन वर्षे इतकी शिथिलता (खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४५ वर्षे) देण्यात आली आहे. त्यानुसार कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४० वर्ष (दिनांक ०२/०७/१९८३ वा त्यापूर्वी जन्म झालेला नसावा) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्ष (दिनांक ०२/०७/१९७८ वा त्यापूर्वी जन्म झालेला नसावा) राहील. |
| (४.२) | माजी सैनिकांकरीता सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत राहील. |
| (४.३) | सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी दिव्यांग उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत राहील. तसेच सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांचेसाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत राहील. |
| (४.४) | सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील. |

| | |
|---|---|
| (४.५) | सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |
| (४.६) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ०१/०७/२०१६ नुसार परिच्छेद क्रमांक ६.२ तक्त्यात दर्शविलेल्या स्पर्धा / खेळांचा समावेश राहील. |
| (४.७) | सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी अत्त्युच्च गुणवत्ताधारक / राष्ट्रीय खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील. |
| (४.८) | अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवारांना अनुसूचित जाती या प्रवर्गातील उमेदवारांकरीता असलेली ४५ वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील. |

**५. मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी :-**

| | |
|---|---|
| (५.१) | मागास प्रवर्गात मोडत असल्याबाबतचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत |
| | अ. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) मधील कलम क्रमांक ३ खालील परंतुकातील तरतुदीनुसार मागासप्रवर्गाच्या दाव्याच्या अनुषंगाने मागणी केलेल्या लाभाची पडताळणी करण्यासाठी उमेदवाराच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी होणे आवश्यक आहे. याबाबत नियुक्तीच्यावेळी लागू असलेल्या शासन नियमांनुसार कार्यवाही केली जाईल.<br><br>ब. महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) मधील कलम क्रमांक ४(२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.[अ], भज [ब], भज [क], भज [ड], विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागू करण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२००८/प्र.क्र. ६९७/विजाभज-१, दिनांक २४ जून, २०१३ नुसार सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी वर्ष २०२२-२३ या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. |

**६. समांतर आरक्षणाच्या अटी :-**

| | |
|---|---|
| (६.१) | महिला आरक्षण हे महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक – ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५/०५/२००१ मधील तरतूदीनुसार राहील.<br><br>महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – महिला २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४/०५/२०२३ नुसार खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. तथापि, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित |

| | |
|---|---|
| | करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याच्या तरतुदी लागू राहतील. |
| (६.२) | राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक – राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१/०७/२०१६ व यासंदर्भात शासनाने पदभरती संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेले नियम, आदेश, निर्णय, इत्यादी मधील तरतुदीनुसार खालील क्रिडा स्पर्धांसाठी आरक्षण लागू राहील. |

| | **गट-अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | | **गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
|---|---|---|---|
| **१.** | **अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा:-** | | गट अ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा |
| I) | ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा. | **१.** | **अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-** |
| II) | एशियन गेम्स. | I) | ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप |
| III) | जागतिक क्रीडा स्पर्धा. | II) | युथ कॉमनवेल्थ गेम्स |
| IV) | एशियन चॅम्पियनशीप. | III) | कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप |
| V) | कॉमनवेल्थ गेम्स. | IV) | कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप |
| VI) | कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप. | V) | आंतरराष्ट्रीय मास्टर किताब (बुध्दिबळ) |
| VII) | युथ ऑलिम्पिक. | | |
| VIII) | ग्रँडमास्टर (बुध्दिबळ) | | |
| **२.** | **पॅरॉलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-** | **२.** | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-** |
| I) | पॅरॉलिम्पिक गेम्स. | I) | राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा. |
| II) | पॅरा एशियन गेम्स. | II) | अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) |
| III) | वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स. | **३.** | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट :-** |
| **३.** | **जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा :-** | | I) राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा |
| I) | जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ. | **४.** | **पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा :-** |
| | | I) | पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा |
| **४.** | **आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :-** | **५.** | **राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा** |
| | आंतराराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित केलेले खेळ. | | |
| **५.** | **ग्रॅन्ड मास्टर किताब** | **६.** | **राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रिडा स्पर्धा** |
| | | **७.** | **अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा** |
| | | **८.** | **आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा** |
| | (टिप - उपरोक्त नमूद अ.क्र. १, ३ व ४ या क्रिडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील) | | (टिप - अ.क्र. १, २, ४, ५ व ६ या स्पर्धांमधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) |
| | **गट- क साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | | |
| | गट-अ व गट-ब या पदाकरिता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा | | |

| | |
|---|---|
| **१.** | **राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा** |
| 1) | राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा |
| **२.** | **राज्य स्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा** |
| **३.** | **राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** |
| **४.** | **राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा** |
| **५.** | **राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)** |
| **६.** | **राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा** |
| **७.** | **राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा** |
| **८.** | **राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा** |
| | (टिप - अ.क्र. १ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी असतील.)<br><br>खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि.०१/०७/२०१६ अन्वये सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने कागदपत्र पडताळणीच्यावेळीच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| (६.३) | महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावामधील मराठी भाषिक उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक — मकसी १००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १०/०७/२००८ मधील तरतूदी लागू राहतील. |
| (६.४) | स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, जनगणना कर्मचारी, निवडणूक कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक — निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६/१०/२०१० मधील तरतूदी लागू राहतील. |
| (६.५) | माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांना जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागेल. |
| (६.६) | भूकंपग्रस्त उमेदवारांना जिल्हाधिकारी यांचे भूकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहीत केलेले प्रमाणपत्र प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करावे लागेल. |
| (६.७) | प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहीत केलेले प्रमाणपत्र प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करावे लागेल. |
| (६.८) | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक — पअंक-१०९७/१७९३/प्र.क्र.४/९८/१६-अ, दिनांक १९/०३/१९९८ अन्वये पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांना / उमेदवारांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्रे प्रथम कागदपत्रे पडताळणी वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागतील. तसेच प्राधिकृत अधिकाऱ्याने वितरीत केलेले अंशकालिन उमेदवाराबाबतचे मूळ प्रमाणपत्र सादर करावे लागेल. |

| | | | |
|---|---|---|---|
| (६.९) | दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचे दिव्यांग प्रमाणपत्र (Disability Certificate) सादर करणे आवश्यक राहील. ४० टक्के पेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांनी दिव्यांग प्रवर्गासाठी अर्ज केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल. | | |
| (६.१०) | नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण २०१८/प्र.क्र.२०४/का-१४२६, दिनांक ०५/०४/२०२१ अन्वये **दिव्यांगत्व** असलेले पुढील प्रवर्गातील उमेदवार प्रस्तुत पदास अर्ज करण्यास पात्र असतील. | | |
| | **पदनाम** | **शारीरिक पात्रता** | **दिव्यांग प्रवर्गासाठी पदे सुनिश्चिती** |
| | सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित) | S, ST, W, RW, SE, C, MF | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | सांख्यिकी सहायक, गट – क | S, ST, W, MF, SE, RW, C | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | अन्वेषक, गट – क | S, ST, BN, MF, RW, SE, C | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| | **शारीरिक पात्रता –** S-Sitting, ST-Standing, W-Walking, BN-Bending, MF-Manipulation by Fingers, SE-Seeing, RW-Reading & Writing, C-Communication<br><br>**दिव्यांग प्रवर्गासाठी पदे सुनिश्चिती –** B-Blind, LV-Low Vision, D-Deaf, HH-Hard of Hearing, OA-One Arm, BA-Both Arms, BL-Both Legs, OL-One Leg, CP-Cerebral Palsy, LC-Leprosy Cured, Dw-Dwarfism, AAV-Acid Attack Victims, ASD (M)-Autism Spectrum Disorder (M=Mild), MI-Mental Illness, SLD-Specific Learning Disability, MD-Multiple Disabilities | | |
| (६.११) | अनाथ आरक्षण हे महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – अनाथ-२०२२/प्र.क्र. १२२/का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ मधील तरतुदीनुसार राहील. सदर भरती प्रक्रियेतील सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क संवर्गातील प्रत्येकी १ पद हे अनाथ आरक्षणातील संस्थात्मक प्रवर्गाकरीता उपलब्ध आहे. महिला व बाल विकास विभाग, शासन पूरकपत्र क्रमांक – अनाथ-२०२२/प्र.क्र. १२२/का-०३, दिनांक १०/०५/२०२३ नुसार भरती प्रक्रियेमध्ये संस्थात्मक प्रवर्गाकरीता अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले | | |

| | |
|---|---|
| | नाहीत तर सदर पद अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील (संस्थाबाह्य प्रवर्ग) उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल. |

## ७. सर्वसाधारण अटी :-

| | |
|---|---|
| (७.१) | उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेला येण्या-जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही. |
| (७.२) | उमेदवारास कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करावे लागेल. |
| (७.३) | **शासकीय नोकर भरतीला लागू असणारे सर्व नियम या भरतीला लागू असतील.** |
| (७.४) | वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक – अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१/१०/२००५ मधील तरतुदींनुसार दिनांक ०१/११/२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परीभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. मात्र, निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४] आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| (७.५) | वयाच्या पुराव्यासाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा सक्षम प्राधिकारी / दंडाधिकारी यांनी दिलेले विहित नमुन्यातील वयाचे प्रमाणपत्र, शासनाच्या किंवा शासनाच्या स्थायी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवाअभिलेखातील जन्मदिनांक नोंदविलेल्या अभिलेखाची प्रमाणित उताऱ्याची प्रत सादर करणे आवश्यक राहील. |
| (७.६) | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा म्हणून जाहिरातीत नमूद अर्हतेच्या गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. |
| (७.७) | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. |
| (७.८) | विहित अर्हता व वयोमर्यादा परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या बाबींशिवाय इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. दिनांक ०१/०७/२०२३ रोजी विहित अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये. |
| (७.९) | न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती अर्जातील संबंधित परिच्छेदात नमूद करावी. नमूद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल उमेदवाराने संचालनालयास वेळोवेळी कळविणे आवश्यक राहील. ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडून आलेले बदल उमेदवाराने संचालनालयास न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार संचालनालयास राहतील. |
| (७.१०) | **संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क ही सर्व पदे राज्यस्तरीय असल्याने निवड झालेले उमेदवार राज्यात कोठेही नियुक्ती / बदलीस पात्र राहतील. सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित) पदासाठी महसुली विभाग वाटप नियम-२०२१ लागू आहे.** |
| (७.११) | उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. |
| (७.१२) | **रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची तसेच आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.** |

| | **त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे तसेच संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार संचालनालय राखून ठेवत आहे. भरती प्रक्रीयेसंदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सदर संचालनालयाचा निर्णय अंतिम राहील.** |
|---|---|

**८. जाहिरातीतील पदाकरीता विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.** ऑनलाईन अर्ज, प्रवेशपत्र व परीक्षेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | वर्तमानपत्रातील जाहिरात | १३/०७/२०२३ | |
| २. | ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी | १५/०७/२०२३ | ०५/०८/२०२३ |
| ३. | प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा संभाव्य दिनांक | परीक्षेपूर्वी ७ ते १० दिवस | |
| ४. | ऑनलाईन परीक्षेचा संभाव्य दिनांक | सप्टेंबर २०२३ | |

सदरहू जाहिरातीस अनुसरून ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत केवळ ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होतील अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.

**९. सहायक संशोधन अधिकारी, गट - ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क पदाकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत :-**

| | |
|---|---|
| (९.१) | उमेदवारांची माहिती ऑनलाईन (ONLINE) अर्जाद्वारे संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने अर्ज भरण्यासाठी विहित केलेला नमुना अर्ज व अर्ज भरावयाची माहिती http://mahades.maharashtra.gov.in व http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'APPLY ONLINE' लिंकवर ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. |
| (९.२) | उमेदवाराने दिनांक १५/०७/२०२३ ते दिनांक ०५/०८/२०२३ पर्यंत अर्ज करावा. ऑनलाईन अर्ज दिनांक ०५/०८/२०२३ पर्यंतच स्विकारण्यात येतील. |
| (९.३) | उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी खालील सूचनांचे पालन करावे. |
| (९.३.१) | खालील मुद्दा क्र. १६.१ ते १६.४ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे उमेदवाराचे स्कॅन केलेले छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अपलोड करण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात असणे आवश्यक आहे. |
| (९.३.२) | परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. |
| (९.३.३) | उमेदवाराने आपला **वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक** नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक परीक्षेचा निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना अर्थ व सांख्यिकी संचालनालय जबाबदार असणार नाही. अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत उमेदवाराच्या ई- |

| | |
|---|---|
| | मेल आयडीवर परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींबरोबर देवाण-घेवाण करु नये. **एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.** |

**१०.** अर्जासोबत भरलेले परीक्षा शुल्क (ऑनलाईन भरलेले शुल्क) कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर चार्जेस उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर मिळणाऱ्या **ई - पावतीची** (Transaction successful झाल्यानंतर) **प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवणे आवश्यक राहील.** परीक्षेच्या वेळी सदर **ई-पावतीची** प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे

## ११. ऑनलाईन अर्ज करण्याबाबतच्या सूचना:-

| | |
|---|---|
| (११.१) | उमेदवाराने प्रथम संचालनालयाच्या **http://mahades.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर जाऊन 'APPLY ONLINE' लिंक वर क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्ज स्क्रिनवर दिसेल. |
| (११.२) | अर्ज नोंदणी करण्याकरीता "Click here for New Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. अर्जदाराने सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वत:कडे लिहून ठेवावा. सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील. |
| (११.३) | जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवाराने "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. दृष्टीने अधू असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य असल्याची खात्री करावी. |
| (११.४) | 'COMPLETE REGISTRATION BUTTON' वर क्लिक केल्यानंतर ऑनलाईन अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे उमेदवारानी ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि सर्व माहिती योग्य असल्याची खात्री करावी. |
| (११.५) | उमेदवाराने स्वत:चे / वडिलांचे / पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या योग्य त्या ठिकाणी प्रमाणपत्रे / गुणपत्रिका / ओळख प्रमाणपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. |
| (११.६) | उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व Save करण्यासाठी "Validate your details" and "Save and Next" या बटनांचा वापर करावा. |
| (११.७) | उमेदवाराने मुद्दा क्र. १६.१ ते १६.४ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅन व अपलोड करावे. |
| (११.८) | COMPLETE REGISTRATION करण्यापूर्वी Preview टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा. |
| (११.९) | आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र, स्वाक्षरी, |

| | |
|---|---|
| | डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "COMPLETE REGISTRATION" बटनावर क्लिक करावे. |
| (११.१०) | "Payment" बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे. |
| (११.११) | त्यानंतर "Submit" बटनावर क्लिक करावे. |
| (११.१२) | उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अप-लोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अप-लोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पद्धतीने भरल्यानंतरच "Submit" बटन प्रेस करावे. एकदा सबमिट बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणे शक्य होणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. सदरची माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. |
| (११.१३) | अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही संचालनालयाने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे असे न केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. |
| (११.१४) | प्रत्येक पदासाठी स्वतंत्र शुल्क भरणे आवश्यक राहील. |

**१२. ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पद्धत :-**

| | |
|---|---|
| (१२.१) | ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित उपलब्ध करुन देण्यात आला आहे. |
| (१२.२) | परीक्षा शुल्क Debit Cards (RuPay / Visa / MasterCard / Maestro), Credit Cards, Internet Banking, IMPS, Cash Cards अथवा Mobile Wallet द्वारे भरता येईल. उमेदवारास परीक्षा शुल्क Debit Cards (RuPay / Visa / MasterCard / Maestro), Credit Cards, Internet Banking, IMPS, Cash Cards अथवा Mobile Wallet द्वारे भरण्याची सुविधा स्क्रिनवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. |
| (१२.३) | ऑनलाईन परीक्षा शुल्काचे सबमिशन केल्यानंतर थोडावेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परीस्थितीत Back किंवा Refresh बटण प्रेस करु नये. |
| (१२.४) | ऑनलाईन ट्रान्झॅक्शन यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते. |
| (१२.५) | उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) उमेदवाराला तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉग ईन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन ट्रान्झॅक्शन यशस्वी न झाल्यास स्क्रिनवर Your online transaction was unsuccessful Please log in again असा संदेश दिसेल. अशावेळी उमेदवाराने ऑन-लाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉग ईन करणे आवश्यक आहे. |
| (१२.६) | **नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-रिसिप्ट मिळेल. सदर ई-रिसिप्ट व ऑनलाईन अर्जाची प्रिंट आऊट काढून ठेवणे आवश्यक आहे. परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर प्राप्त झालेली ई-पावती उमेदवाराने स्वत:कडे ठेवावी. ई-पावतीची प्रत उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबत सादर करावी.** |
| (१२.७) | क्रेडीट कार्डाने परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी. |
| (१२.८) | अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ब्राऊझर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी. |

**१३.** उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी विहित जागी अप-लोड केल्यानंतर स्क्रिनवर संपूर्ण अर्ज दिसेल. सदर अर्ज योग्य पद्धतीने भरण्यात यावा. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**१४.** एखाद्या उमेदवारास एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्याने प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र रजिस्ट्रेशन करुन त्याच आधारे प्राप्त होणाऱ्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड वापरुन ऑनलाईन अर्ज व विहित परीक्षा शुल्क भरावे.

## १५. अर्ज भरण्याच्या महत्वाच्या सूचना:-

| | |
|---|---|
| १. | रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाची माहिती भरण्यास उमेदवार स्वत: जबाबदार आहे. त्यास संचालनालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. |
| २. | उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही. |
| ३. | उमेदवाराने अर्जात स्वत:चे नांव, सामाजिक प्रवर्ग, जन्मदिनांक, ज्या पदाकरीता अर्ज केला त्या पदाचे नांव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिति काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिति चुकल्यास त्यास संचालनालय जबाबदार राहणार नाही. |
| ४. | उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पद्धतीने रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्याच्या ई-मेल आयडी / मोबाईल नंबरवर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एस.एम.एस द्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पद्धतीने रजिस्टर झाला नाही असे समजावे. |
| ५. | अपूर्ण उदा. छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) इत्यादी नसलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील. |
| ६. | वरील कार्यपद्धती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुस-या पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविले जातील. |
| ७. | अर्जात भरलेल्या पत्त्यामध्ये किंवा इतर माहितीमध्ये बदल करता येणार नाही. |
| ८. | उमेदवाराने अर्जावर अपलोड केलेल्या स्वाक्षरी प्रमाणेच प्रवेशपत्र व उपस्थिती पत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. |
| ९. | तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेल्या छायाचित्राप्रमाणेच छायाचित्र प्रवेशपत्र व उपस्थितीपत्रावर चिकटवणे आवश्यक आहे. |

## १६. छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅनिंग करण्याच्या सूचना :-

उमेदवाराने खाली नमूद केल्याप्रमाणे त्याचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅन करुन अर्ज भरते वेळी अपलोड करणे आवश्यक आहे.

| (१६.१) | **छायाचित्र** |
|---|---|
| १. | अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे (४.५cm X ३.५cm) रंगीत छायाचित्र असावे. |
| २. | सदरचे छायाचित्र हे फिकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे. |
| ३. | कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सूर्य प्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. जर फ्लॅशचा वापर केल्यास “red eye” येणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४. | जर तुम्ही चष्मा वापरत असाल तर तुमचे डोळे दिसतील अशाप्रकारे छायाचित्र असावे. |

| | |
|---|---|
| ५. | छायाचित्र काढते वेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये, जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ६. | छायाचित्र २०० x २३० pixels एवढे असावे व त्याचा आकार २० kb ते ५० kb इतका असावा. |
| ७. | स्कॅन केलेले छायाचित्र हे ५० kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी. जर त्याचा आकार ५० kb पेक्षा मोठा असेल तर ते adjust करुन मुद्दा क्रमांक १६.१ मधील ६ प्रमाणे करण्यात यावे. |
| (१६.२) | **स्वाक्षरी** |
| १. | उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वतः स्वाक्षरी करावी. |
| २. | सदरची स्वाक्षरी ही ऑनलाईन अर्जावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी. |
| ३. | अर्जासोबत अपलोड केलेली स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४. | स्वाक्षरीचा आकार १० kb ते २० kb व त्याचे dimensions १४० x ६० pixels एवढे असावे. |
| ५. | स्वाक्षरीची स्कॅन केलेली इमेज ही २० kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी. |
| (१६.३) | **डाव्या अंगठ्याचा ठसा** |
| १. | उमेदवाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा काळ्या अथवा निळ्या शाईने पांढ-या कागदावर उमटवावा. डाव्या अंगठ्याचा ठसा योग्यरित्या स्कॅन केलेला असावा, त्यावर डाग येऊ नये. (जर उमेदवाराला डावा अंगठा नसेल, तर तो अर्ज करण्यासाठी उजव्या अंगठ्याचा वापर करू शकतो.) |
| २. | त्याची फाईल ही JPG किंवा JPEG format मध्ये असावी. |
| ३. | डाव्या अंगठ्याचा ठसा स्कॅन करुन अपलोड करावयाचा आहे. त्यासाठी स्कॅनरचे dimensions २४० x २४० pixels एवढे व रिझॉल्यूशन हे २०० डी.पी.आय. (Dots Per Inch) एवढे असावे. उदा. ३ सेमी * ३ सेमी (Width * Height) |
| ४. | त्याचा आकार २० kb ते ५० kb इतका असावा. |
| (१६.४) | **<u>हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration)</u>** |
| १. | उमेदवाराने खाली नमूद स्वत:च्या हस्ताक्षरातील हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅन करुन अर्ज भरते वेळी अपलोड करणे आवश्यक आहे.<br>“I______ (Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required.” |
| २. | उमेदवाराने हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) काळ्या शाईने पांढ-या कागदावर स्पष्टपणे इंग्रजी भाषेत लिहावे. |
| ३. | त्याची फाईल ही JPG किंवा JPEG format मध्ये असावी. |
| ४. | हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅन करुन अपलोड करावयाचे आहे. त्यासाठी स्कॅनरचे dimensions ८०० x ४०० pixels एवढे व रिझॉल्यूशन हे २०० डी.पी.आय. (Dots Per Inch) एवढे असावे. जसे उदा. १० सेमी * ५सेमी (Width * Height) |
| ५. | त्याचा आकार ५० kb ते १०० kb इतका असावा. |
| (१६.५) | **<u>छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅनिंग करण्याची पद्धत:-</u>** |
| १. | छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे रिझॉल्यूशन हे २०० डी.पी.आय. (Dots Per Inch) एवढे असावे. |
| २. | कलर हा true colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी. |
| ३. | उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित |

| | |
|---|---|
| | घोषणापत्र (hand written declaration) असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG किंवा JPEG format मध्ये असावी. |
| ४. | छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अप-लोड करण्यासाठी ऑनलाईन अर्जात स्वतंत्र लिंक देण्यात आली आहे. |
| (१६.६) | **छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अप-लोड करण्याची पद्धत** |
| १. | छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अप-लोड करण्यासाठी "Upload Photograph / Upload Signature / Upload Left thumb impression / Upload hand written declaration" या स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा / हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) असलेली File सिलेक्ट करावी व 'Open/Upload' या बटनावर क्लिक करावे. |
| २. | जर उपरोक्त परिच्छेद १६.५ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) नसेल तर स्क्रिनवर error message दिसेल. |
| (१६.७) | **उमेदवाराचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्त लिखित घोषणापत्र (hand written declaration) अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.** |

## १७. परीक्षा शुल्क

(१७.१) उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. सदर शुल्क हे ऑनलाईन स्वरूपातच भरणे आवश्यक आहे व ते **ना परतावा** राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. **माजी सैनिक उमेदवारांना फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

| पदाचे नाव | खुला प्रवर्ग | मागासवर्गीय प्रवर्ग |
|---|---|---|
| सहायक संशोधन अधिकारी, गट – ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क | रु. १०००/- | रु. ९००/- |
| माजी सैनिक | परीक्षा शुल्क नाही | |

**टिप :-** उमेदवाराने परीक्षा शुल्कासोबत बँकेच्या नियमानुसार सेवा कर व इतर कर ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक राहील.

(१७.२) सहायक संशोधन अधिकारी, गट – ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी वर निर्दिष्ट केलेले परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(१७.३) परीक्षा शुल्क भरल्याबाबतची खातरजमा झाल्यावरच अर्जावर पुढील कार्यवाही केली जाईल. उमेदवारांनी आवश्यक ते परीक्षा शुल्क भरले नसल्यास सदर उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल. मागासवर्ग उमेदवारांना परीक्षा शुल्कात सूट असल्याने मागासवर्गासाठीचे शुल्क भरणाऱ्या उमेदवारांबाबत जर कागदपत्र पडताळणी वेळेस मागासवर्गाबाबतची आवश्यक ती प्रमाणपत्रे आढळून आली नाहीत, तर त्या उमेदवारास अपात्र ठरविणे / उमेदवारी रद्द करणे अशी कार्यवाही करण्यात येईल. तसेच माजी सैनिक उमेदवारांना फी भरण्यापासून सुट देण्यात आली असल्याने कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस माजी सैनिक असल्याबाबतची आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास त्या उमेदवारास अपात्र ठरविणे / उमेदवारी रद्द करणे अशी कार्यवाही करण्यात येईल.

**१८.** उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय निवड केली जाईल. त्यासाठी उमेदवारांनी अर्जात दिलेल्या माहितीच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने प्राप्त केलेली प्रमाणपत्रे योग्य माध्यमातून प्राप्त केली नसल्यास किंवा गैरमार्गाने प्राप्त केली असल्यास अथवा खोटी किंवा बनावट असल्याचे दिसून आल्यास उमेदवाराचे नाव भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल / सेवा समाप्त करण्यात येईल.

**१९. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. पदासाठीची शैक्षणिक अर्हता व त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली असल्यास, उच्च शैक्षणिक अर्हतेसंबंधीची माहिती अर्जात देणे आवश्यक आहे. ही माहिती समान गुण प्राप्त झाल्यास गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी वापरण्यात येते. अर्जासोबत माहिती न देता तदनंतर वरील माहिती उमेदवाराने निदर्शनास आणली तरीही गुणवत्ता यादी सुधारण्यात येणार नाही. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास, खोटी माहिती भरल्यास, तसेच भरलेली माहिती व सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रे यात तफावत आढळल्यामुळे अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.**

**२०.** सर्व पदांसाठी उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी. विहित नमुन्यानुसार / निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार संचालनालय स्वत:कडे राखून ठेवत असून यासंदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

| | |
|---|---|
| (२०.१) | उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. ऑनलाईन अर्जातील माहिती अचूक नोंदविली जाईल याची खबरदारी उमेदवारांनी स्वत: घ्यावी. अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राहय धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत. अर्जात नोंदविलेल्या माहितीबाबत संचालनालय जबाबदार राहणार नाही. |
| (२०.२) | ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्राचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर दाखला, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला, माजी सैनिक असल्याचा दाखला, अनाथ प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती व त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती, ई-पावतीची प्रत, सिस्टीम जनरेटेड ऑनलाईन अर्जाची प्रत, प्रमाणपत्र / कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करावी लागेल. |
| (२०.३) | अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रामधील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. यासाठी संचालनालय जबाबदार राहणार नाही. |
| (२०.४) | शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत प्रमाणपत्र / कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| (२०.५) | **ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाची व ई-पावतीची प्रत उमेदवाराने स्वत: जवळ काढून ठेवावी. प्रमाणपत्र / कागदपत्र तपासणीवेळेस अर्जाची प्रत व ई-पावती सादर** |

| | |
|---|---|
| | **करणे अत्यावश्यक आहे. अर्जाची प्रत तसेच ई-पावती सादर न केल्यास व प्रमाणपत्रामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व याबाबतीत संचालनालय जबाबदार राहणार नाही.** |
| (२०.६) | **सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, या भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अद्ययावत सूचना, तारखेतील व इतर बदल संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसारित करण्यात येतील. प्रत्येक उमेदवारास या सूचना स्वतंत्रपणे कळविल्या जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अद्ययावत सूचनेसाठी संचालनालयाचे संकेतस्थळ उमेदवाराने वारंवार पाहणे आवश्यक आहे.** |

## २१. ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र मिळणे बाबत

| | |
|---|---|
| (२१.१) | अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेच्या दिनांकापर्यंत http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे. प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (अर्जासोबत अपलोड केलेलेच) चिकटवावे. सदर छायाचित्रावर राजपत्रित अधिकाऱ्याचे साक्षांकन करून परीक्षेस आणणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास ऑनलाईन परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. |
| (२१.२) | **प्रवेशपत्र** :- परीक्षेचे केंद्र, परीक्षेचे ठिकाण, पत्ता, ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद, परीक्षा दिनांक आणि वेळ प्रवेशपत्रात नमूद करण्यात येईल. |
| (२१.३) | ज्या उमेदवाराने यशस्वीपणे नोंदणी केली आहे त्या उमेदवाराने परीक्षेचे प्रवेशपत्र http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन आपला नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड / जन्मदिनांक हा तपशील भरुन प्राप्त करुन घ्यावयाचे आहे. कोणत्याही उमेदवारास पोस्टाने / कुरीअरने प्रवेशपत्राची प्रत पाठविली जाणार नाही. उमेदवारांना प्रवेशपत्राबाबतची, तसेच परीक्षेबाबतची सूचना त्यांनी नोंदणीच्या वेळी नोंदविलेल्या ई-मेल आयडी वर ई-मेलद्वारे आणि भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेश सेवेद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवारास ई-मेल आयडी वर ई-मेलद्वारे पाठविलेल्या आणि भ्रमणध्वनी क्रमांकावरील लघुसंदेश सेवेद्वारे पाठविण्यात आलेल्या सूचना भ्रमणध्वनी क्रमांक / ई-मेल आयडी बदलल्याने, तांत्रिक अडचणीमुळे किंवा अन्यथा अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे उमेदवारास उशिराने मिळाल्याबाबत / न मिळाल्याबाबत अर्थ व सांख्यिकी संचालनालय जबाबदार राहणार नाही. म्हणून भरती प्रक्रीयेबाबतचा अधिक तपशील, अद्ययावत माहिती व इतर माहितीसाठी उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वेळीवेळी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच त्यांनी नोंदविलेला ई-मेल अकाऊंट वेळोवेळी तपासावे. |

## २२. ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| **अ]** | **सहायक संशोधन अधिकारी, गट – ब (अराजपत्रित) व सांख्यिकी सहायक, गट – क** पदांकरीता परीक्षेचा दर्जा मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. **ऑनलाईन** परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ५० गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. **ऑनलाईन** परीक्षा २०० गुणांची राहील. |
| **ब]** | **अन्वेषक, गट – क** पदाकरीता परीक्षेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. ऑनलाईन परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ५० गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. **ऑनलाईन** परीक्षा २०० गुणांची राहील. |

| | |
|---|---|
| | परीक्षेची वेळ, परीक्षेचा कालावधी याबाबतचा तपशिल प्रवेशपत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात येईल. |

## २३. उमेदवारांची निवड

| | |
|---|---|
| (२३.१) | सहायक संशोधन अधिकारी, गट – ब (अराजपत्रित), सांख्यिकी सहायक व अन्वेषक, गट – क या पदांसाठी फक्त ऑनलाईन परीक्षेच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.<br>**वरील पदांसाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.** |
| (२३.२) | **उमेदवारास समान गुण असल्यास** – परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४ /का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२, तसेच याबाबतीत शासनाकडील इतर निकषांनुसार लावला जाईल. |
| (२३.३) | सदर जाहिरातीतील उल्लेख केलेली वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अटी संबंधित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता दर्शवितात. |
| (२३.४) | **प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीच्या अधिन राहून उमेदवारांची निवड करण्यात येईल.** |

## २४. परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना

| (२४.१) | **केंद्र** |
|---|---|
| १. | परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल. |
| २. | परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही. |
| ३. | अर्थ व सांख्यिकी संचालनालय कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि/किंवा परीक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे. |
| ४. | अर्थ व सांख्यिकी संचालनालय उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे. |
| ५. | उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत:च्या जबाबदारी व स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालय त्यास जबाबदार राहणार नाही. |

## २५. ओळख पटवणे

| | |
|---|---|
| १. | परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / बँकेचे फोटोसहीतचे पासबुक / फोटोसहीत आधारकार्ड / गॅझेटेड अधिकाऱ्यांच्या किंवा लोकप्रतिनिधींच्या सहीचे मूळ लेटरहेडवरील फोटो परिचय पत्र / महाविद्यालयाचे / विद्यापिठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटविण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>**टिप:-** उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक |

| | |
|---|---|
| | ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नांवात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br><br>सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>अ. परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र<br>आ. मूळ फोटो ओळखपत्र<br>इ. फोटो ओळखपत्राची छायाप्रत आणि<br>ई. परीक्षा शुल्क ऑनलाईन भरल्याची ई-पावती |
| २. | **परीक्षेला उशिरा येण्याबाबत:-** परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी **दोन तास असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण चार तास परीक्षा स्थळावर उपस्थित राहावे लागेल.** |

## २६. परीक्षेच्या वेळी दिव्यांग व्यक्तींना मदतनिसाची सवलत देण्याबाबत

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक - दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि. क. २, दिनांक ०५/१०/२०२१ अन्वये "लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबातची मार्गदर्शिका, २०२१" मधील तरतुदींनुसार अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेले) / मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत खालील प्रमाणे अटी व नियम असतील -

| | |
|---|---|
| (२६.१) | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारीमधील अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेले) / मेंदूचा पक्षाघात असलेले दिव्यांग उमेदवार मदतनीस (लेखनिक / वाचक) वापरण्यास पात्र असतील. |
| (२६.२) | परीक्षेसाठी मदतनीस वापरण्यास पात्र असलेल्या व जे मदतनीसाच्या सेवा वापरु इच्छितात अश्या उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेच्या अर्जामध्ये योग्य त्या ठिकाणी तसे काळजीपूर्वक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. नंतर आलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. |
| (२६.३) | दिव्यांग उमेदवाराने मदतनीस (लेखनिक / वाचक) पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी / जिल्हा शल्य चिकिस्तक / वैद्यकिय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक - दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि. क. २, दिनांक ०५/१०/२०२१ नुसार विहित नमुन्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अशा उमेदवारास मदतनीस (लेखनिक / वाचक) नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल. |
| (२६.४) | अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेले) / मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी मदतनीसाची (Scribe) आवश्यकता असल्यास त्या उमेदवारांनी स्वतःच्या खर्चाने त्याची व्यवस्था करावी. |

| | |
|---|---|
| (२६.५) | मदतनीस कोणत्याही शैक्षणिक शाखेमधील असू शकतो. दिव्यांग उमेदवारास मदतनीस (लेखनिक / वाचक) वापरण्याची परवानगी असल्यास मदतनीस (लेखनिक / वाचक) यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरीता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी. |
| (२६.६) | दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि / अथवा उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास मदतनीसाची मदत अनुज्ञेय आहे. मदतनीसाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने उत्तर छायांकित करण्यास / लिहिण्यास मदत करणे अपेक्षित आहे. मदतनीसाने प्रश्न वाचून दाखविल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहित ठिकाणी चिन्हांकित (Marking) करणे अपेक्षित आहे. |
| (२६.७) | एक मदतनीस एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी वापरता येणार नाही. उमेदवाराने निवडलेला मदतनीस हा परीक्षेसाठी उमेदवार असता कामा नये. तसेच मदतनीसास उमेदवाराने दिलेल्या उत्तराव्यतिरिक्त स्वत:हून कोणतेही उत्तर नोंदविता येणार नाही. भरती प्रक्रिये दरम्यान कोणत्याही पातळीवर याचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |
| (२६.८) | उमेदवार व मदतनीस या दोघांनीही प्रवेशपत्रासोबत परीक्षेच्यावेळी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापत्रात मदतनीस वर नमूद केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करत असल्याची खात्री केल्याचे नमूद करणे बंधनकारक राहील. पुढे कोणत्याही टप्प्यावर मदतनीस वरील निकष पूर्ण करत नसल्याचे किंवा वस्तुस्थिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अर्जदाराची उमेदवारी ऑनलाईन परीक्षेचा निकाल काहीही लागला तरी रद्द करण्यात येईल. |
| (२६.९) | मदतनीस वापरणाऱ्या उमेदवारांना परीक्षेसाठी प्रत्येक तासाला वीस मिनीटे भरपाई वेळ अनुज्ञेय राहील. |
| (२६.१०) | दृष्टीने अधु (४० टक्केपेक्षा कमी) असणारे उमेदवार परीक्षेचा पेपर मोठ्या आकाराच्या अक्षरात पहाण्याचा (Content of text in Magnified font) पर्याय निवडू शकतात. हा पर्याय निवडलेले उमेदवार परीक्षेसाठी प्रत्येक तासाला वीस मिनीटे भरपाई वेळ मिळण्यास पात्र असतील. परंतु मदतनीस वापरणाऱ्या उमेदवारांना मोठ्या आकाराच्या अक्षरात पाहण्याची (Content of text in Magnified font) सुविधा उपलब्ध होणार नाही. |
| (२६.११) | ४० टक्क्यांपेक्षा कमी हालचालीस बाधा आणणारी कमजोरी असलेले / गतिमंद (Locomotor disability / Cerbral palsy) जे लिहू शकतात असे उमेदवार परीक्षेसाठी प्रत्येक तासाला वीस मिनीटे भरपाई वेळ मिळण्यास पात्र असतील. तथापि त्यांना मदतनीसाचा वापर करता येणार नाही. |

**२७. निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही:-**

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

**परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार,**

| | |
|---|---|
| १. | अनुचित प्रकार करणे किंवा |
| २. | तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा |
| ३. | परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा पाठविणे आणि साठविणे सुकर करणे किंवा |

| | |
|---|---|
| ४. | स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा |
| ५. | स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा |
| ६. | दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे. |

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास**

| | |
|---|---|
| १. | तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल. |
| २. | अर्थ व सांख्यिकी संचालनालयासाठी घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debar) केले जाईल. |
| ३. | जर उमेदवार अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमानुसार कार्यवाही केली जाईल. |

**२८. परीक्षा घेतांना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि / किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. याबाबत अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचा निर्णय अंतिम राहील. ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.**

**२९.** या भरती प्रक्रीयेअंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**३०.** एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळ्या सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.

**३१.** पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

**३२.** शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.

**३३.** निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

राज्यस्तरीय निवड समिती
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.